दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ६ ऑगस्ट २०२५ | अंक २२८ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


**आजचा दिनविशेष**

१९१४ : पहिले महायुद्ध – सर्बियाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले आणि ऑस्ट्रियाने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.


SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक दिल से दिल तक | www.suntourismpune.in

सन टुरिझम प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :- 99222 22272 / 7602727555


# आता मराठा आरक्षण मिळवल्याशिवाय फेटा बांधणार नाही



मराठा आरक्षण लढ्यातील विजय मिळवल्याशिवाय आपण फेटा बांधणार नाही अशी शपथ जणू मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी 29 ऑगस्टला मुंबईला धडक देण्याची तयारी सुरु केली आहे. या आंदोलनात आता माघार घेतली जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली होती. आता आपण मराठा



आरक्षण मिळवूनच स्वस्थ बसणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईला धडक देणार असल्याचे म्हटले आहे. आज धाराशिव येथे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्याकडून फेटा बांधण्याचा आग्रह करण्यात आला. त्यावेळी आता मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाल्यावरच फेटा खालू असे म्हणत त्यांनी फेटा बांधण्यास नकार दिला आहे. 29 ऑगस्ट रोजी होणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आमदार सक्रिय सहभाग घेणार आहेत.महाविकास आघाडी आंदोलनात सक्रीय मनोज जरांगे पाटील यांचा धाराशिवमध्ये दौरा आणि गाठीभेटी घेणे सुरु आहे. यावेळी त्यांच्या मराठा आरक्षण लढ्याच आपण सक्रीय सहभाग घेणार असल्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी सांगितलं. संपूर्ण महाविकास आघाडी आरक्षण आंदोलनात सक्रिय सहभागी असेल असेही उद्धव ठाकरे गटाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी म्हटले आहे.

## बोगस विना परवाना खत विक्री करणारे आढळून आल्यस कृषी विभगाशी संपर्क साधावा

बीड दि. 05 : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,आशिष काळूसे, तंत्र अधिकारी गु.नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड, सायप्पा गरांडे, मोहीम अधिकारी जिल्हा परिषद बीड, वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक, यांच्या उपस्थीतीत आणि सर्वांच्या प्रयत्नाने कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) तालुका कृषी अधिकारी कवडे एम. बी, माजलगाव यांनी अनधिकृत रित्या विना पावती, बोगस खत विक्री करणाऱ्या जगदंबा कृषी सेवा केंद्र पाथरुड आणि जगदंबा ॲग्रो एजन्सी लामानवाडी ता.माजलगाव यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023, अत्यावश्यक वस्तू अधिनियम 1955 व खत



नियंत्रण आदेश 1985 मधील तरतुदी अन्वये माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि 04 ऑगस्ट 2025 रोजी पहाटे 2:10 वा. गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरील ठिकाणाहून बोगस खताच्या वापरलेल्या (रिकाम्या) 23, सीलबंद 13 व अर्धवट 03 अशा एकूण 39 बोगस खताच्या बॅग जप्त करून संबंधित पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कुणीही बोगस विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास कृषी विभागास संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाच्या भरारी पथकाने केले आहे.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेस ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

बीड दि. 05 : प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम 2025 मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना बीड जिल्हयांत राबविण्यात येत असून या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतक-यांनी सहभाग घेण्याची अंतिम मुदत दिनांक 31 जुलै, 2025 अशी होती. बीड गत वर्षीच्या तुलनेत कमी सहभागी, शेतकऱ्यांकडे AgriStack फार्मर आय डी नसणे, PMFBY पोर्टल सेवेतील व्यत्यय आधार (UIDAI) व CSC सर्व्हरवरील व्यत्यय राज्याच्या पोर्टलच्या तांत्रिक/सेवेतील व्यत्याय इत्यादीमुळे शेतकऱ्यांना योजनेत सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने दि. 01 ऑगस्ट, 2025 रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी 14 ऑगस्ट, 2025 कर्जदार शेतकऱ्यांना 30 ऑगस्ट, 2025 पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढीस मान्यता दिली आहे.

तरी जिल्ह्यातील विमा भरण्यापासून वंचित राहिलेल्या सर्व बिगर कर्जदार शेतकरी बांधवांनी तात्काळ आपल्या पिकाचा विमा 14 ऑगस्ट 2025 पूर्वी आणि कर्जदार शेतकरी यांनी 30 ऑगस्ट 2025 पूर्वी भरून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

## राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम



बीड, दिनांक ०५ (प्रतिनिधी) : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. दिनांक ०६ ऑगस्ट रोजी दुपारी ०३.१५ हेलिकॉप्टरने पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड, पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन नंतर दुपारी ०३.३० मोटारीने शासकीय विश्रामगृह, बीड येथे आगमन व राखीव नंतर मोटारीने प्रयाण सायं.०५.०० जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व बीड जिल्ह्यातील विविध पतसंस्था मधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत आढावा बैठक सायं. ०६ वा. बीड जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समितीची बैठक सायं. ०६.३० बीड जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक सायं. ०६.४५ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नागरिकांसाठी Chat - Bot सेवामित्र सुविधेचे उद्घाटन सायं. ०७ बीड जिल्ह्यातील डॉक्टर व इंडियन मेडीकल असोसिएशन संघटनेसोबत चर्चा सायं. ०७. ३० बीड जिल्ह्यातील उद्योग व व्यापारी संघटनेसोबत बैठक मोटारीने शासकीय विश्रामगृह, बीड येथे आगमन व मुक्काम ****

## उपमुख्यमंत्री झाडे लावणार. पण संगोपन व संरक्षण होणार का? शेख युनूस

| बीड (प्रतिनिधी)बीड जिल्ह्यात 7 ऑगस्ट रोजी 'हरित बीड' अभियान राबवले जाणार असून, या अंतर्गत 30 लाख वृक्षांचे भव्य वृक्षारोपण उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी स्थान येथे करण्यात येणार आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी, हवामान बदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळवण्यासाठी वृक्षारोपण हे आजच्या काळात अत्यंत गरजेचे



झाले आहे. वृक्ष हवेतील कार्बन डाय-ऑक्साइडचे शोषण करून शुद्ध ऑक्सिजनचा पुरवठा करतात, पाण्याची पातळी सुधारतात, तसेच भूजल पुनर्भरणातही मोठे योगदान देतात. मात्र, झाडे लावणे पुरेसे नाही — त्यांचे संगोपन व संरक्षण अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा वृक्षारोपण मोहिमा फक्त एक औपचारिकता म्हणून केल्या जातात आणि काही महिन्यांतच लावलेली झाडे मरून जातात. काल झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी साहेबांनी सांगितले की, "70 टक्के झाडांचे रक्षण करण्याचा आमचा प्रयत्न असेल." हा निर्धार नक्कीच स्वागतार्ह आहे. पण प्रश्न असा आहे की — खरंच तेवढे झाडे वाचतील का? जर वृक्षारोपणासोबतच दीर्घकालीन देखभाल, स्थानिक सहभाग, पाणीपुरवठा आणि जनजागृती केली गेली, तरच 'हरित बीड' हे अभियान यशस्वी ठरेल. शेवटी, झाडे लावणे एक दिवसाचं काम आहे, पण ती जगवणे ही वर्षांची जबाबदारी आहे.

## पाटोदा नगरपंचायत हद्दीतील राऊतवस्ती, मुळेवस्ती रस्त्यावर लाखो रुपय खर्चूनही अंधारातच

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा नगरपंचायत हद्दीतील राऊतवस्ती, मुळेवस्ती परिसरातील नागरिक आजही अंधारात जीवन जगत आहेत. संत तुकाराम महाराज विद्यालय ते रेणुका माता मंदिर या रस्त्यावर लाखो रुपये खर्चून विद्युत पोल उभारण्यात आले, मात्र अद्याप त्यावर विद्युत दिवे कार्यान्वित झालेले नाहीत. परिणामी नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या मार्गावर संत तुकाराम महाराज शाळेसह,समाजकल्याण विभागाचे मुलांचे आणि मुलींचे वस्तीगृह तसेच रेणुका माता मंदिर आहे. यामुळे येथे सतत वर्दळ असते. दिवसभर अभ्यास करून रात्री वस्तीगृहात परतणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधारामुळे जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो. महिलांनाही अंधारात ये-जा करताना असुरक्षिततेची भावना जाणवते."पोल लावून काय उपयोग, जर दिवेच चालू होत नसतील?" असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. याबाबत तत्काळ पाठपुरावा करून विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी दिवे कार्यान्वित करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी अपेक्षा संपूर्ण परिसरातून व्यक्त होत आहे. दुकानांवर मराठीत पाटी नसल्यास प्रतिकामगार दोन हजार रुपये दंड किंवा न्यायालयीन कारवाईची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. ज्या दुकानावर मराठी पाटी नसेल त्या दुकानांचा फोटो काढला जात आहे.

## माजलगांव शहरात मोकाट कुत्र्यांचा वावर नागरिका सह विद्यार्थी यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे



### माजलगांव नगर परिषदेचे दूर्लक्ष

माजलगांव प्रतिनिधि माजलगाव : शहरात मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, चेष्ट नागरिक आणि विद्यार्थी यांना खुप त्रास होत आहे माजलगांव शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या हजारोंच्या घरात पोहोचली असून, कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने ही समस्या दिवसेंनदिवस गंभीर होत चालली आहे. माजलगांव शहरातील मुख्य रस्ता चौक, नविन फॉल्टा वर , आणि सार्वजनिक ठिकाणी या कुत्र्यांनी आपला कब्जा मिळवला आहे. झेडा चोंक तसेच बुखारी शाळा जुना तहेसिल परिसर महेबुब नगर, समता कॉलोनी ते मंजरथ रोड असे अनेक विविध भागांमध्ये हे कुत्रे टोळक्याने वावरत आहे , माजलगाव कराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. लहान मुले, विद्यार्थी व्यवस्कर वेक्ती तसेच शेंळ्या व कोमड्यावर हल्ले करताना दिसत आहे ज्येष्ठ नागरिकाना घराबाहेर पडताना भीती वाटत आहे. पाऊसळयाचा महिना सुरू असल्याने या कुत्र्याने जास्तच धुमाकूळ घातले आहे माजलगांव शहरात शाळेला व खाजगी क्लासेस पालक आपल्या पाल्यांना बाहेर सोडताना धास्तावत आहे रात्रीच्या वेळी कामावरून उशिरा मोटरसाइकिल वरुण परतणाऱ्या कामगारांना कुत्र्यांच्या टोळक्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. या कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे व उग्रपणे वावरण्यामुळे नागरिकांची झोपमोड होत आहे. काही वेळा चावण्याच्या घटना देखील घडले आहे तर खरेच चौर आले कि काय असा भी प्रश्न निर्माण झाला आहे ,माजलगांव नगरपालिकेकडून या समस्येकडे अजूनही दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे तसेच कन्या शाळे जवळ व इतर ठिकानी जागोजागी कचर्याचे ढिगारे दिसत आहे नगर परिषद प्रशासक ताब्यात असल्याने लोकप्रतिनिधींकडे तक्रार करण्याचीही सोय नाही. मोकाट कुत्र्यांचे तात्काळ बंदोबस्त करण्यात यावे असे नागरिकांकडून जोर धरू लागले आहे.अन्यथा एखादी मोठी घटना घडण्याआधी प्रशासनाने जागे होणे.गरजे आहे, प्रशासनाने कुत्र्याची नस बंदी करावी नंसता कोठे सोढूण यावे असे नागरिकात बोलले जात आहे ,

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# सं पा द की य

## शिक्षण आणि समाज - प्रगतीचे दोन आधारस्तंभ

शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे – हा विचार केवळ पुस्तकात वाचण्यापुरता नाही, तर प्रत्यक्ष जीवनात जगण्याचा आहे. शिक्षण व्यक्तीला फक्त अक्षरज्ञान देत नाही, तर त्याच्या विचारशक्तीला धार लावते, विवेक वाढवते, आणि समाजात सकारात्मक बदल घडविण्याची ताकद देते. सुशिक्षित व्यक्ती ही समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली असते, आणि समाज हा त्या शिक्षणाला पोषक वातावरण देणारा सुपीक शेत आहे. या दोन्ही घटकांचा परस्पर संबंध जितका मजबूत, तितकी राष्ट्राची प्रगती निश्चित.

शिक्षण – समाज परिवर्तनाचे साधन शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा पदवी मिळवणे नव्हे; तर जीवनाला योग्य दिशा देणे होय. हे व्यक्तीच्या चारित्र्यनिर्मितीचे भांडार आहे. शिक्षणामुळे – अंधश्रद्धा, जातीयवाद, वाईट परंपरा यांना छेद मिळतो.

स्त्री–पुरुष समानतेचा विचार रुजतो. न्याय, समानता आणि बंधुतेचे तत्त्व बळकट होते. व्यक्तीमध्ये आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

एका सुशिक्षित तरुणाची विचारसरणी केवळ त्याचे आयुष्य बदलत नाही, तर त्याच्या कुटुंब, शेजार, आणि अखेरीस संपूर्ण समाजावर सकारात्मक प्रभाव टाकते.

समाज – शिक्षणाचा पोषक घटक

शिक्षणाची गुणवत्ता केवळ शिक्षक किंवा शाळांवर अवलंबून नसते; तर ती समाजाच्या दृष्टिकोनावरही अवलंबून असते.

जर समाजात शिक्षणाला प्राधान्य दिले, तर शैक्षणिक संस्था चांगल्या दर्जाच्या उभ्या राहतात.

पालक, सामाजिक संस्था, आणि स्थानिक प्रशासन शिक्षणाच्या वृद्धीसाठी एकत्र काम करतात.

मुला–मुलींना समान संधी दिल्यास सामाजिक न्याय साध्य होतो.

परंतु जर समाजात शिक्षणाबद्दल उदासीनता असेल, तर गरिबी, बेरोजगारी, आणि असमानता वाढते.

सध्याच्या काळातील आव्हाने

आज तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा महासागर उपलब्ध आहे. पण या महासागरात योग्य आणि चुकीची माहिती दोन्ही प्रवाहित आहे. त्यामुळे माहितीचे फिल्टरिंग आणि विवेकबुद्धीचा वापर शिकवणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.

सोशल मीडियावर पसरत असलेली अफवा आणि चुकीची माहिती थांबवण्यासाठी समिक्षक वृत्ती जोपासणे गरजेचे आहे.

ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणातील दरी कमी करणे आवश्यक आहे.केवळ नोकरीसाठी नव्हे, तर स्वावलंबी, जबाबदार आणि नैतिक नागरिक घडवण्यासाठी अभ्यासक्रमात बदल होणे गरजेचे आहे

निष्कर्ष

शिक्षण आणि समाज हे दोन चाकांसारखे आहेत – एकही चाक दुर्बल असेल, तर गाडी पुढे सरकत नाही. म्हणून शिक्षण हे प्रत्येकासाठी सुलभ, गुणवत्तापूर्ण आणि जीवनाभिमुख असले पाहिजे, आणि समाजाने त्या शिक्षणाला वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे.

सुशिक्षित समाज = सुसंस्कृत समाज = सबल राष्ट्र हा समीकरणाचा गाभा आहे.

ज्ञानदीप तेवत ठेवा, अज्ञानाचा अंधार हरवूया,
शिक्षण–संस्कार जोपासून, नवा सुवर्ण समाज घडवूया.



सौ. प्रज्ञा मेश्राम घोरपडे
मालवणी टाऊनशिप मनपा इंग्रजी शाळा पी/ उत्तर विभाग मालाड (पश्चिम)

# श्री क्षेत्र चाकरवाडी महाराष्ट्रातच काय जगभरात पोहचली आहे नाना महाराज कदम यांचे प्रतिपादन..

बीड प्रतिनिधी - चाकरवाडी येथील ग्रामस्थांच्या पूर्वजांनी पुण्य केले आहे सद्गुरु बाळनाथ महाराजांची तपश्चर्या फळाला आली म्हणून सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडी मध्ये आले आहेत. दादा श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आल्यापासून अखंड अन्नदान सेवा चाकरवाडी मध्ये सुरु आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह पार पडला यामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने भावी भक्तांनी महाप्रसाद घेतला. यावेळी चाकरवाडी ही महाराष्ट्रातच काय तर जगभरामध्ये पोहोचली आहे. जगभरातून आता दादा माऊलींच्या दर्शनासाठी भाविक भक्त चाकरवाडी या ठिकाणी येतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बाळनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे तपोनिधी शांतीब्रह्म ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा झी टॉकीज फेम ह.भ.प.प्रा डॉ नाना महाराज कदम नेकनुर यांची संपन्न झाली.



महाराजांनी जगद्गुरु श्री संत श्री तुकोबाराय यांच्या सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या अभंगावर ती चिंतन केले. महाराजांनी चिंतन करत असताना परमात्म्याचे तटस्थ लक्षण व स्वरूप लक्षण सांगितले जगाचा मालक पांडुरंग परमात्मा किती सुंदर आहे हे सांगितले. अतिशय सुंदर असे विठ्ठलाचे ध्यान, कमरेवर हात ठेऊन विटेवर उभा आहे .त्याच्या गळ्यात तुळशीचा हार आहे पीतांबर नेसलेला आहे असे हे विठ्ठलाचे रूप मला नेहमीच आवडते .मसोळीच्या आकारची कुंडले त्याच्या कानात झळकत आहेत गळ्यात कौस्तुभमणी धारण केलेला आहे .तुकाराम महाराज म्हणतात की, हे ध्यान माझे सर्वसुख आहे असे सुशोभित ध्यान मी नेहमी आवडिने पाहीन. देवाकडे जा देव तुम्हाला मुक्त केल्या शिवाय राहणार नाही देवाकडे तुम्ही कोणत्या पण रूपात गेलात तर देवाला सगळे सारखेच असतात त्यासाठी देव तुम्हांला मुक्त केल्या शिवाय राहत नाही. असे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. विठ्ठल कोणाला म्हणावे, सुंदर कोणाला म्हणावे, आपले कोण आहे, देवाकडे का पाहावे, देवाकडे का जावे महाराजांनी सांगताना सांगितले की या जगामध्ये देवा शिवाय आपले कोणाच नाही.मानवाला सौंदर्य देणारा तो देव आहे, प्रत्येक मानवाला जे सौदर्य दिले आहे ते भगवान परमात्म्याने दिलेले आहे. देवापुढे कोणालाच माफ केलं जात नाही. आपले भविष्य पाहण्यासाठी कोणाकडे हात दाखवू नका आपले भविष्य चांगलेच आहे आपला वर्तमान चांगला असेल तर भविष्य चांगलेच आहे ज्याचे अंतःकरण स्वच्छ आहे, सुंदर आहे त्याला तुम्ही सुंदर म्हणा. आपले सौंदर्य हे कधी तरी संपणारे आहे देवाचे सौंदर्य कधी न संपणारे भारी आहे की देवाचे सौंदर्य हे कधीही संपणारे नाही ते आनंदमय आहे. अविनाशी आनंदघन अमूर्त मूर्ती मधुसूदन देवाच्या सौंदर्याकडे जर पाहील तर आनंद होतो.देव तुमच अंतःकरण पाहिल्याशिवाय राहणार नाही. महाराजांनी अभंगामधून भाविकांना अनेक संदेश देत आपली सेवा संपन्न केली. यावेळी गायनाचार्य सतीश महाराज जाधव, महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, म्हणजे पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# ऊसतोड मजुरांच्या सक्षमीकरणासाठी आज मिशन साथीचा भव्य शुभारंभ
## ऊसतोड मजुरांनो मिशन साथी चा लाभ घ्या : राज्याध्यक्ष प्रदीप भांगे

बीड | लोकपत्रकार भांगे बीड जिल्ह्यातील हजारो ऊसतोड मजुरांच्या आयुष्यात ठोस बदल घडवून आणण्यासाठी आजपासून “मिशन साथी” या उपक्रमाचा भव्य शुभारंभ करण्यात येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता बीड येथे या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा आरंभ होणार आहे. बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत गाळप हंगामात हजारो कुटुंबं स्थलांतरित होतात. या स्थलांतरामुळे मजुरांच्या मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो. यावर उपाय म्हणून २०२४-२५ मध्ये १९६ हंगामी निवासी शाळांद्वारे २०,५९५ विद्यार्थ्यांना शिक्षणात ठेवण्यात यश आले. मिशन साथी” अंतर्गत खालील उपक्रम राबवले जाणार आहेत:महिला आरोग्यसाथींची निवड:१००० महिलांना आरोग्यसाथी म्हणून प्रशिक्षित करून आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली कामाला लावले जाणार आहे. त्यांना प्राथमिक उपचाराचे प्रशिक्षण, माहितीपुस्तिका व औषधपेट्या दिल्या जातील. गोपीनाथ मुंडे महामंडळाच्या योजना जनतेपर्यंत:महामंडळाच्या सर्व योजना एका माहिती पुस्तिकेद्वारे मजुरांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत.टोल-फ्री क्रमांक सुरु: स्थलांतरदरम्यान मजुरांना येणाऱ्या अडचणींसाठी नवीन टोल-फ्री हेल्पलाईन सुरु केली जाणार आहे.१००% ओळखपत्र वितरण:बीड जिल्ह्यातील सर्व मजुरांची ग्रामपंचायत स्तरावर ओळखपत्रांसाठी नोंदणी



करण्यात येणार आहे, ज्यामुळे सरकारी योजनांचा लाभ मिळवणे सुलभ होणार आहे. संपूर्ण योजनांचा लाभ ‘सॅच्युरेशन’ पद्धतीने:आयुष्यमान भारत कार्ड, घरकुल योजना, रेशन कार्ड आदी महत्त्वाच्या योजनांचा लाभ प्रत्येक नोंदणीकृत मजुराला मिळणार आहे.Whatsapp ChatBot सेवा:घरकुल योजनेसंबंधित तक्रारी निवारणासाठी विशेष Whatsapp ChatBot सेवा सुरू केली जात असून त्याचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत महिलांना औषधपेट्यांचे वाटप करण्यात येणार आहे.या ऐतिहासिक उपक्रमासाठी ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूकदार, स्वयंसेवी संस्था आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाबाबत महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार मुकादम वाहतूक संघटनेचे राज्याध्यक्ष मा. प्रदीप श्रीरंगराव भांगे यांनी सर्व संबंधितांनी उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# शिवसेना नेत्याच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक!
## बीड जिल्हा शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे- जगताप, मुळूक, गलधर

बीड, प्रतिनिधी- विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेना मोठ्या ताकदीने कामाला लागली असून उद्या दि. 7 ऑगस्ट 2025 रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु 2.30 वाजता, धाराशिव येथील पदाधिकाऱ्यांची सायं. 4.00 वाजता आणि परभणी येथील पदाधिकाऱ्यांची सायं. 5.00 वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री उदयजी सामंत साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी



खोतकर साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला शिवसेना युवासेना महिला आघाडी यांचे जिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, तालुका संघटक, विधानसभा प्रमुख, विधानसभा संघटक, विधानसभा समन्वयक, शहर प्रमुख, शहर संघटक, शहर समन्वयक यांनीच फक्त बैठकीला उपस्थित राहावे अशा वरिष्ठांकडून सूचना आहेत. या आडवा बैठकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात येणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी कळवले आहे बीड जिल्ह्यासह धाराशिव, परभणी जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांन ची पण बैठक याच ठिकाणी होणार असल्याचे सांगितले आहे

००००० 

# कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथे शेतकरी शास्त्रज्ञ संवाद उत्साहात संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : दि.२-ऑगस्ट रोजी कृषी विज्ञान केंद्र पोखरणी, महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी वाटपाचा २० व्या हप्त्याचे वितरण कार्यक्रमानिमित्त शेतकरी व शास्त्रज्ञ संवाद या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र पोखरणी नांदेड- १ येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाची सुरुवात कृषी अनुसंधान परिषद गीताने करण्यात आली असून कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी कृ.वी. के चे संचालक डॉ.एस. डी.मोरे सर उपस्थित होते.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.दत्तकुमार कळसाईत, ता.कृ.अ.श्री.भगवान तवर, मं.कृ अ.श्री.सानप हे देखील त्यावेळी उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी १८ गावातील एकूण २०० शेतकऱ्यांनि सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात बळीराजाच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जारीकोटे (सहाय्यक कृषी अधिकारी) यांनी तर प्रास्ताविक डॉ.डी.ए.देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) कृ.वि.के. पोखरणी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत शेतकऱ्यांच्या जाणून घेतलेल्या समस्यांचा आढावा व त्यावर उपाययोजना आणि तंत्रज्ञान यावर सखोल असे मार्गदर्शन करून शास्त्रज्ञांच्या संशोधनाची दिशा शेतकऱ्यांच्या समस्येनुसार ठरवली जाईल, तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन वैयक्तिक सल्ला व मार्गदर्शन देखील आम्ही करू असे आवाहन त्यांनी त्यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना करण्यात आले. त्यानंतर श्री.दत्तकुमार कळसाईत यांनी शेतमाल प्रक्रिया उद्योग,महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना आणि योजनांचे लाभार्थी बनण्यासाठी शेतकरी ओळख पत्राची गरज,शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना,फळबाग लागवड योजना याबद्दल माहिती सांगून शेतकऱ्यांनी वेळोवेळी कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्र अशी जोडून योजनांचा प्रशिक्षणाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ घेऊन कमी खर्चात चांगले उत्पन्न घेण्याकडे वाटचाल करावी असे आवाहन त्यावेळी शेतकऱ्यांना करण्यात आले. तसेच कृषी विद्या तज्ञ प्रा.एस.एच.जायभाये यांनी कीड व रोग नियंत्रण, जैविक निविष्ठा तयार करणे व त्यांचा वापर घनकचरा न जाळता शेतात कुजवल्याने खतावर होणाऱ्या खर्चामध्ये बचत करता येईल,तसेच दिवसेंदिवस जमिनीचा पोत ढासळणार नाही आणि त्याचा आरोग्यावर देखील दुष्परिणाम कमी होऊन वाढत्या आजारांचे प्रमाण आटोक्यात येईल, असे त्यावेळी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी देखील आपल्या मनोगतामध्ये शेतीतील समस्या



आणि शेतकऱ्यांना शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार मिळावा तसेच शेती पिकामध्ये शेतकऱ्यांनी एकमताने वेगवेगळी पिके घेण्याचा निर्णय घेतला तर बाजारात शेतीमालाला व्यवस्थित बाजारभाव देखील मिळेल असे त्यावेळी सुचवले. तसेच रासायनिक शेतीमुळे अन्नधान्याची गुणवत्ता देखील ढासळत चाललेली आहे आणि त्यावर उपाय म्हणून नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे काळाची गरज बनली आहे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पशुवैद्यक तज्ञ डॉ.एम.एन.अंबोरे यांनी केले असून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी कृषी विभागातील सहाय्यक कृषी अधिकारी तसेच उप कृषी अधिकारी यांची देखील विशेष उपस्थिती लाभली.तसेच कृ.वि. के च्या गृह विज्ञान तज्ञ सौ.ए.एस. पवळे,कृषी विस्तार तज्ञ डॉ.ए.एम. क्षत्रिय,श्री.ए.जी.भालेराव,श्री. आर.आर.इंगोले, श्री.आर.टी.वाडीले, सौ.पी.एस.हाडोळतीकर, श्री.डी.आर. कदम, श्री.एस.एस.गायकवाड, श्री. एस.आर.कोणापुरे, श्री.आर.जी.राऊत आणि श्री.संतोष वाघमारे यांचे देखील हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष सहकार्य लाभले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# वंचित बहुजन आघाडीची गेवराई येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात आढावा बैठक संपन्न



गेवराई प्रतिनिधी -दि. ४ ऑगस्ट २०२५ आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गेवराई येथे एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. ही बैठक सोमवारी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, गेवराई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीला बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर तालुका अध्यक्ष अजयकुमार (पप्पु) गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखणे, संघटन बळकट करणे आणि प्रचाराची दिशा निश्चित करणे या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला कार्यकर्ते, वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक नेते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक प्रश्न, मतदारांची अपेक्षा, निवडणुकीतील आव्हाने व पक्षाचे धोरण यावरही विचारविनिमय करण्यात आला. या बैठकीतून वंचित बहुजन आघाडीने तालुकास्तरावर संघटन मजबूत करून आगामी निवडणुकांमध्ये निर्णायक भूमिका बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी धम्मानंद साळवे, राजाभाऊ पोकळे, खंडू नाना जाधव, संदीप रोकडे, अर्जुन जवंजाळ, भीमराव चव्हाण,अजय कुमार गायकवाड, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, किशोर भोले, ज्ञानेश्वर हवाले, प्रमोद निकाळजे, किशोर चव्हाण, प्रदीप शिंदे, अनिल बोराडे, किरण गायकवाड, सचिन कांडेकर,अंकुश जाधव, नवनाथ त्रिभुवन, विकास बनसोडे, विनोद थोरात, अशोक पवार, संजय शरणांगत, रोहित कदम, नामदेव भिसे, मिलिंद तायड, महादेव वीर,कृष्णा सामसे, सुधाकर केदार, राहुल त्रिभुवन, उदय तुपारे, सुभाष बांगर, प्रकाश सदाफुले, आत्माराम सदाफुले, विनोद पोटफोडे, अनिल साळवे, किशोर मोहिते, धोंडीबा पंडित, विजय निकाळजे, स्वप्निल जोगदंड, माणिक राठोड, वैभव पोटफडे, बाबासाहेब प्रधान, साईनाथ सुतार, सतीश नाडे, अशोक थोरात, नवनाथ थोरात, कृष्णा हातागळे, विजू खरात, बाबुराव पोटभरे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# श्री क्षेत्र चाकरवाडी महाराष्ट्रातच काय जगभरात पोहचली आहे नाना महाराज कदम यांचे प्रतिपादन

बीड प्रतिनिधी - चाकरवाडी येथील ग्रामस्थांच्या पूर्वजांनी पुण्य केले आहे सद्गुरु बाळनाथ महाराजांची तपश्चर्या फळाला आली म्हणून सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडी मध्ये आले आहेत. दादा श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आल्यापासून अखंड अन्नदान सेवा चाकरवाडी मध्ये सुरू आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह पार पडला यामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने भावी भक्तांनी महाप्रसाद घेतला. यावेळी चाकरवाडी ही महाराष्ट्रातच काय तर जगभरामध्ये पोहोचली आहे. जगभरातून आता दादा माऊलींच्या दर्शनासाठी भाविक भक्त चाकरवाडी या ठिकाणी येतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बाळनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे तपोनिधी शांतीब्रह्मा ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात



आले आहे. पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा झी टॉकीज फेम ह.भ.प.प्रा डॉ नाना महाराज कदम नेकनुर यांची संपन्न झाली. महाराजांनी जगद्गुरु श्री संत श्री तुकोबाराय यांच्या सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या अभंगावर ती चिंतन केले. महाराजांनी चिंतन करत असताना परमात्म्याचे तटस्थ लक्षण व स्वरूप लक्षण सांगितले जगाचा मालक पांडुरंग परमात्मा किती सुंदर आहे हे सांगितले.अतिशय सुंदर असे विठ्ठलाचे ध्यान, कमरेवर हात ठेऊन विटेवर उभा आहे .त्याच्या गळ्यात तुळशीचा हार आहे पीतांबर नेसलेला आहे असे हे विठ्ठलाचे रूप मला नेहमीच आवडते .मसोळीच्या आकारची कुंडले त्याच्या कानात झळकत आहेत गळ्यात कौस्तुभमणी धारण केलेला आहे .तुकाराम महाराज म्हणतात की, हे ध्यान माझे सर्वसुख आहे असे सुशोभित ध्यान मी नेहमी आवडिने पाहीन. देवाकडे जा देव तुम्हाला मुक्त केल्या शिवाय राहणार नाही देवाकडे तुम्ही कोणत्या पण रूपात गेलात तर देवाला सगळे सारखेच असतात त्यासाठी देव तुम्हांला मुक्त केल्या शिवाय राहत नाही. असे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. विठ्ठल कोणाला म्हणावे, सुंदर कोणाला म्हणावे, आपले कोण आहे, देवाकडे का पाहावे, देवाकडे का जावे महाराजांनी सांगताना सांगितले की या जगामध्ये देवा शिवाय आपले कोणाच नाही.मानवाला सौंदर्य देणारा तो देव आहे, प्रत्येक मानवाला जे सौदर्य दिले आहे ते भगवान परमात्म्याने दिलेले आहे. देवापुढे कोणालाच माफ केलं जात नाही. आपले भविष्य पाहण्यासाठी कोणाकडे हात दाखवू नका आपले भविष्य चांगलेच आहे आपला वर्तमान चांगला असेल तर भविष्य चांगलेच आहे ज्याचे अंतःकरण स्वच्छ आहे, सुंदर आहे त्याला तुम्ही सुंदर म्हणा. आपले सौंदर्य हे कधी तरी संपणारे आहे देवाचे सौंदर्य कधी न संपणारे भारी आहे की देवाचे सौंदर्य हे कधीही संपणारे नाही ते आनंदमय आहे. अविनाशी आनंदघन अमूर्त मूर्ती मधुसूदन देवाच्या सौंदर्याकडे जर पाहील तर आनंद होतो.देव तुमच अंतःकरण पाहिल्याशिवाय राहणार नाही. महाराजांनी अभंगामधून भाविकांना अनेक संदेश देत आपली सेवा संपन्न केली. यावेळी गायनाचार्य सतीश महाराज जाधव, महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, म्हणजे पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका - बाळराजे पवार
# सरसकट पि.टी.आर वाटप करू - मुख्याधिकारी विक्रम मांडुरके

गेवराई: दि. 5 : वार्ताहर : शहरातील अतिक्रमण धारकास पि.टी.आर वापट करताना, कुणावरही अन्याय होणार नाही. याची दक्षता घ्या आणि पीटीआर वाटपात भेदभाव करु नका, अशी अपेक्षा युवा नेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केली. दरम्यान, अन्याय होणार नाही. सरसकट पि.टी.आर वाटप करू ,असे आश्वासन मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी दिले आहे.

पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी महाराष्ट्र सरकारने 2018 ला शासननिर्णय केला होता त्या नंतर गेवराईचे माजी.आ.लक्ष्मण अण्णा पवार यांनी तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन संजयनगर साठेनगर येथील अतिक्रमण धारकास 15 ऑगस्ट 2021 रोजी पि.टी.आर वाटप करण्यात आले होते त्यावेळेस संजयनगर येथील शासकीय जागेवरील आरक्षण असलेल्या अतिक्रमण धारकास सोडुन संजयनगर येथील 207 अतिक्रमण धारकास तर साठेनगर येथील 225 अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्यात आला होता. शासकीय जागेवरील आरक्षण उठवण्यासाठी त्यांनी प्रस्ताव पाठवाला होता त्या डि.पी. प्लॅनला 2024 ला मंजुरी मिळाल्यानंतर संजयनगर येथील काही आरक्षण उठवण्यात आले होते म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी एप्रिल महिन्यात एक जाहीर



प्रगटण काढुन अतिक्रमण धारकास पि.टी. आर साठी अर्ज दाखल करण्यास सांगितले होते त्या अनुषंगाने संजयनगर येथील काही अतिक्रमण धारकास पि.टी.आर.ची प्रकिया सुरु आहे त्या संदर्भात माहीती घेऊन अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका अशा सुचना बाळराजे पवार यांनी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांना केली आहे

यावेळी माहीती देतांना मुख्याधिकारी म्हणाले की शासन निर्णयानुसार 2018 पासून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्याची प्रक्रिया सुरु असून संजयनगर मधील अतिक्रमण धारकास टप्प्या टप्प्याने आदेश होऊन शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमण धारकास सरसकट पि.टी.आर वाटप करण्यात येणार आसल्याचे मुख्यांधिकारी विक्रम मांडुरके यांनी माहीती दिली आहे

आज दि.,5 रोजी बाळराजे पवारांच्या उपस्थितीत नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळेस मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, यांच्या सह सर्व मा.नगरसेवक,पदाधिकारी व अतिक्रमण धारक उपस्थित होते

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी सप्ताह निमित्त ५ दिवस जि.प. आरोग्य विभागाकडून टीम सेवेत असणार - संचालक धनंजय गुंदेकर
# पहिल्याच दिवशी २१५ भाविक भक्तांनी आरोग्य सेवेचा घेतला लाभ

बीड (प्रतिनिधी) श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथे साप्ताहनिमित दररोज हजारी भाविक भक्त येत असतात. यातील बहुतांश भाविक भक्त मुक्कामीच असतात. या भाविक भक्तांना आरोग्य विषयक समस्या निराकरण करण्यासाठी आरोग्य टीम पूर्णवेळ असणे आवश्यक होते याच अनुषंगाने संचालक धनंजय गुंदेकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी श्री उल्हास गंडाळ यांच्याकडे आरोग्य टीम उपलब्ध करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती.. या मागणीची दखल घेत श्री उल्हास गंडाळ यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना सूचना देत नाळवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राची टीम श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथे आरोग्य सेवेत दिली आहे. काल दिनांक 5 ऑगस्ट रोजी पहिल्याच दिवशी 215 भाविक भक्तांनी विविध आजारांसाठी येथील आरोग्य सेवेचा लाभ घेतला. यावेळी नाळवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी काकडे , काटकर, जाधव, आरोग्य प्रशिक्षणार्थी अक्षय गाडीवान यांनी भाविक भक्तांना सेवा दिली.. यावेळी संचालक धनंजय गुंदेकर यांच्यासह मानकुरवाडी सरपंच ज्ञानेश्वर जोगदंड, मौजवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते दादा जाधव, राधेश्याम फड, भीमा शेलार, उत्तरेश्वर जाधव, बाळासाहेब कदम, आबासाहेब ढवळे, गहिनीनाथ महाराज, ढेंगे पाटील, लहू जाधव आदी उपस्थित होते..



## कु छाया उंब्रजकर यांना राज्यस्तरीय ज्ञानविद्या विकास रत्न पुरस्कार

सोलापूर येथील दै संचारची लेखिका कु छाया उंब्रजकर यांना समृद्धी पर्यटन , सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय ज्ञानविद्या विकास रत्न दि . ०३|०८|२५ रोजी करवीर वाचन मंदीर , कोल्हापूर येथे आयोजित सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला . पुरस्काराचे स्वरूप मानपत्र , प्रशस्तीपत्र , आणि सन्मानचिन्ह असे होते . त्यांच्या शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील योगदानाने आजपर्यंत बरेच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहेत . आत्ताच त्यांना मिळालेले पुरस्कार :-
१} आधार सोशल फाऊंडेशन , बेळगाव तर्फे आदर्श शिक्षका
२}छत्रपतीशिवाजीमहाराजयांच्या३६५व्याजयंतीनिमित्तशिवप्रेरणापुरस्कार
३} ५ वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन -२०२५ बेडकिहाळ येथे राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार तर्फे आदर्श समाज रत्न पुरस्कार
४} ग्लोबल गोल्ड टॅलेंट बूक ऑफ रेकॉर्ड आयोजित गुरू पौर्णिमेनिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार
५} कै . बसवंत नागू शिंगाडे सामाजिक सेवाभावी संस्था , बेळगाव येथून राष्ट्रीय फिनिक्स ग्लोबल अॅवॉर्ड
६} सा . आम्ही मुंबईकर वृत्तपत्र यांच्या तर्फे सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार मिळालेला आहे . यापूर्वी देखील त्यांना सामाजिक , साहित्य व शैक्षणिक कार्यासाठी राज्यस्तरीय , राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत .

# बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर उत्साहात
# आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते महसूल विभागाच्या विविध दाखल्यांचे वितरण

बीड दि.४ (प्रतिनिधी):- बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बीड तहसील कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर उत्साहात पार पडले. यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महसूल विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध दाखल्यांचे, आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.



बीड तहसील कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताहाच्या निमित्ताने सोमवारी (दि.४) रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आ.संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे दाखले, रेशन कार्ड, जन्म-मृत्यू प्रामाणपत्र तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना आदी योजनेच्या लाभार्थ्यांना मंजूरीपत्र व दाखल्यांचे वितरण आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह बीड तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच बीड तालुक्यातील महसूल विभागाच्या विविध योजनांचे लाभार्थी आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडमधील अनधिकृत होर्डिंग्ज हटवा अन्यथा अजित पवारांची गाडी अडवू
# शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांचे सीओंना निवेदन; न.प.कडून पक्षपातीपणे कारवाई

बीड (प्रतिनिधी) दि.५ : शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने बीड शहरात लावण्यात आलेले झेंडे व बॅनर नगरपरिषद प्रशासनाने कार्यक्रमाच्या आदल्यादिवशीच हटवले. मात्र, त्याचवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वागतासाठी शहरात लावलेली शेकडो अनधिकृत होर्डिंग्ज अजूनही तिथेच आहेत. त्या तातडीने हटवाव्यात, अन्यथा अजित पवारांची गाडी अडवून निषेध करण्यात येईल, असा इशारा शेकापचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी मंगळवारी (दि.५) मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी नागेश मिठे, अर्जुन सोनवणे, अजय हजारे यांच्यासह



पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले की, ३ ऑगस्ट रोजी क्रांतिसिंह नाना पाटील आणि कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याच्या प्रचारासाठी १ व २ ऑगस्ट रोजी शहरात विविध ठिकाणी बॅनर, झेंडे व होर्डिंग्ज लावण्यात आले होते. मात्र, नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या दिवशी सकाळीच ही प्रचार सामग्री हटवली. कार्यकर्त्यांनी विनंती करूनही "अजितदादा येणार आहेत" हे कारण देत ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, अजित पवार यांच्या बीड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर होर्डिंग्ज लावण्यात आले असून त्यातील बहुतांश अनधिकृत आहेत. मात्र, त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. जर सर्व पक्षांना समान न्याय दिला जात असेल, तर आजच रात्रीपर्यंत सर्व अनधिकृत होर्डिंग्ज हटवावीत, अन्यथा अजित पवार बीडमध्ये दाखल होताच आंदोलनात्मक पद्धतीने त्यांची गाडी अडवून निषेध करण्यात येईल,

## अनुचित प्रकाराची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची

अनधिकृत होर्डिंग्जवर वेळेवर कारवाई न केल्यास उद्भवणाऱ्या आंदोलनामुळे कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची पूर्ण जबाबदारी नगरपरिषद प्रशासनावर राहील, असा इशाराही भाई मोहन गुंड यांनी दिला आहे.

## होर्डिंग्जला परवानगी प्रक्रिया बंद, मग कारवाई कधी?

भाई मोहन गुंड व शेकापच्या शिष्टमंडळाने नगरपरिषद प्रशासनाकडे अनधिकृत होर्डिंग्जसंदर्भात निवेदन दिले असता, सध्या होर्डिंग्जला परवानगी देण्याची प्रक्रिया बंद असल्याची माहिती प्रशासनाने दिली. मग शहरात लावलेली ही अनधिकृत होर्डिंग्ज कशाच्या आधारावर आहेत आणि त्यांच्यावर कारवाई कधी केली जाणार? असा सवाल गुंड यांनी अधिकाऱ्यांना उपस्थित केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बुधवार ६ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# बीड शहरात रस्त्याच्या मधोमध असणारे रोहित्र म्हणजे विद्युत बॉम्बच ; महावितरण आणि नगरपरीषद यांची टोलवाटोलवी तर लोकप्रतिनिधींच्या डोळ्यावर झापडं ; जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०५ ) बीड शहरातील चौकाचौकात आणि रस्त्याच्या कडेला असणारी रोहित्रे हि एखाद्या विद्युत बॉम्ब प्रमाणेच उभी असुन कधी या रोहित्राचा स्फोट होईल सांगता येत नाही. धोकादायक रोहीत्रे किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त उंचीवर असणे बंधनकारक असताना ३ते ४ फुट उंचीवर असणा-या रोहित्रांमुळे बीडकरांचा जीव धोक्यात आहे.रोहित्राचा स्फोट होऊन त्यातुन उडालेल्या तेलामुळे रस्त्याने जाणारी मुले भाजल्याच्या घटना घडलेल्या आहेत.महावितरणच्या रस्त्याच्या मधोमध असणा-या धोकादायक डिपी हटविण्यात यावी अशी नागरीकांनी नगर परिषद आणि महावितरणला वारंवार मागणी करूनही प्रशासनाला याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते.नगरपरीषद महावितरणकडे तर महावितरण नगरपरीषदेकडे बोट दाखवून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करत आहे. लोकप्रतिनिधींनी डोळ्यावर झापड बांधल्याने त्यांना याचे गांभीर्य दिसून येत नसल्याने एकंदरीतच एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. डीपीमध्ये आग लागल्याने स्फोट होऊन शाळकरी मुलांना गंभीर धोका होण्याची शक्यता पण प्रशासनाला गांभीर्य नाही :- उत्तमराव मिसाळ नागरीक बीड ---कॅनॉल रोड ते तुळजापूर मध्ये अनेक यशवंतराव विद्यालय, शिवाजी विद्यालय तसेच विविध खाजगी कोचिंग क्लासेस , वसतिगृह या परीसरात आहेत. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीकांची वर्दळ असणाऱ्या या परीसरात महावितरणची विद्युत डीपी रस्त्याच्या मधोमध आहे.रस्त्यावरून ये जा करणा-या शाळकरी मुलांना याचा धोका





आहे.प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करते असा आरोप येथील रहिवासी उत्तमराव मिसाळ यांनी केला आहे.

एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? :- डॉ.गणेश ढवळे सामाजिक कार्यकर्ते बीड शहरात गेल्या २ वर्षात अनेक ठिकाणी शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेंतर्गत जवळपास १४० कोटी रुपयांच्या सिमेंट क्रांकीट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली. मात्र रस्त्याच्या मध्यभागी व कडेला असलेली उघडी व जमिनीलगत असणारे रोहित्रे आणि पोल हटविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व विद्युतखांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही.काही ठिकाणी वीज रोहित्र ऐन वर्दळीच्या ठिकाणी आणि बाजारपेठेतच आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने आर्थिंग मधुन करंट, उघड्या तारा ,फ्युजची उघडी पेटी धोक्याचे कारण ठरण्याची शक्यता आहे.सुचना फलक,रक्षक संरचना किंवा सुरक्षा नसल्याने गंभीर अपघाताची शक्यता आहे. यासंदर्भात तक्रारी,निवेदने आणि आंदोलनानंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. शहरातील धोकादायक रोहित्रे शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड,तुळजाई चौक,राजीव गांधी चौक, बार्शी नाका,केएसके महाविद्यालय परीसर, बालेपीर,माने काम्प्लेक्स रोड, सुभाष रोड, जालना रोड,जुने एसपी कार्यालय,कंकालेश्वर मंदिर, अण्णाभाऊ साठे चौक, अहिल्यादेवी होळकर पुतळा, बलभीम महाविद्यालय, पंचशील नगर,शाहुनगर, मोमीनपुरा आदी ठिकाणी उघडे रोहित्र आणि त्यात उघडे फ्युज बाक्स, वीज वाहिनी उपकरणे धोकादायक स्थितीत आहेत. महावितरण आणि नगरपरीषद यांची टोलवाटोलवी, जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न रस्ता रुंदीकरण करताना रोहित्रे व ईतर विद्युत उपकरणांचे स्थलांतर हे नगरपालिका व बांधकाम विभागाचे काम असल्याचे तर उघड्यावरील उपकरणांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येईल असे प्रेमसिंग राजपुत्र अधिक्षक अभियंता महावितरण बीड परीमंडळ स्पष्टीकरण देतात.तर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी आंदोलन अनुषंगाने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना दिलेल्या लेखी पत्रात शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले रोहित्र व विद्युत पोल महावितरणच्या मालकीचे असल्यामुळे ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवुन नगरपरिषदेला सहकार्य करावे अशा आशयाचे पत्र अधिक्षक अभियंता महावितरण यांना दिले आहे.एकंदरीतच महावितरण आणि नगरपरीषदेच्या भोंगळ कारभार नागरीकांच्या मुळावर आला आहे.

## हाजी अरफात शेख यांचा खणखणीत इशारा: खाटीक समाजाच्या हितासाठी लढणार, समाजात द्वेष पसरवणारे जातीयवादी गुंडांनो खबरदार!

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी: हज हाऊस येथे आयोजित राज्य मुस्लिम खाटीक सेवा संस्थेच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात हाजी अरफात शेख यांनी खाटीक समाजाच्या हितासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. “मी वोट मागायला नाही, तर समाजाच्या समस्या सोडवायला आलो आहे,” असा खणखणीत इशारा देत त्यांनी समाजाला एकजुटीचे आवाहन केले. या व्यासपीठावर एमआयएम जिल्हाध्यक्ष शफीक शेख, जावेद कुरेशी आणि हाजी जे.डी. शहा यांची उपस्थिती होती. १२ वर्षांचा लढा, आता ३६ जिल्ह्यांमध्ये मोहीम गेल्या १२ वर्षांपासून मुंबईत सर्वपक्षीय नेत्यांना एकत्र आणून खाटीक समाजाच्या



समस्या मांडणाऱ्या हाजी अरफात यांनी यंदा राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये फिरून प्रत्येक गावातील अडचणी जाणून घेण्याचा संकल्प सोडला आहे. “महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठबळाने मी समाजाच्या समस्या जाग्यावरच सोडवणार,” असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेषत: खाटीक समाजाला एससी प्रवर्गातून आरक्षण मिळवून देण्यासाठी ते पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. “माझा समाज जागेल, तेव्हा इन्कलाब येईल,” असा जोरदार नारा देत हाजी अरफात यांनी समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या वाटेवर नेण्याचे स्वप्न उलगडले. मीरा रोडवरील एका मुलीने पायलट होऊन बोईंग उडवल्याचा दाखला देत ते म्हणाले, “माझा समाज आता प्रगतीच्या मार्गावर आहे.” ग्रामीण भागातील अडचणींवर भाष्य करताना त्यांनी लातूरमधील एका वृद्ध महिलेची आठवण सांगितली, जी त्यांना “माझा राजा” म्हणाली. “तिच्या घरी गॅस नव्हता, चूल होती. अशा अडचणी मी सोडवणार,” असे ठाम आश्वासन त्यांनी दिले. जातीयवादी हल्ल्यांविरुद्ध आक्रमक भूमिका घेत हाजी अरफात म्हणाले, “जो कोणी माझ्या समाजाला त्रास देईल, त्याला हा हाजी अरफात सोडणार नाही!” जावेद कुरेशी यांना पाठिंबा देत ते म्हणाले, “जावेद भैय्या, तुम्ही पुढे जा, मी तुमच्या सोबत आहे!” भाजपामधील आपल्या भूमिकेचा अभिमान व्यक्त करत त्यांनी समाजाच्या भविष्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. समाजाच्या एकजुटीचा संदेश “मी बाजारात येऊन समाजाच्या अडचणी जाग्यावरच सोडवणार,” असे आश्वासन देत हाजी अरफात यांनी उपस्थितांचा उत्साह द्विगुणित केला. हा मेळावा खाटीक समाजाच्या एकजुटीचा आणि प्रगतीचा संदेश घेऊन संपन्न झाला.

## श्री प्रकाश महामुनी यांना राज्यस्तरीय साहित्य विकासरत्न प्रेरणा पुरस्कार



बार्शी येथील ज्येष्ठ साहित्यिक तथा भारत संचार निगम लिमिटेडचे निवृत्त उपमहाप्रबंधक श्री प्रकाश महामुनी यांना समृद्धी पर्यटन ,सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय साहित्य विकासरत्न प्रेरणा पुरस्कार २०२५, रविवार दि . ०३|०८|२५ रोजी करवीर वाचन मंदिर , कोल्हापूर येथे आयोजित सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र,प्रशस्तीपत्र, आणि सन्मान चिन्ह असे आहे.आत्तापर्यंत श्री प्रकाश महामुनी यांना साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानामुळे तसेच सामाजिक क्षेत्रातील योगदानामुळे साहित्य भूषण,समाज गौरव,समाज रत्न,इत्यादी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.राज्यस्तरीय साहित्यरत्न प्रेरणा पुरस्काराने गौरवण्यात आल्याबद्दल सोनार समाज सेवा संस्था सोलापूर तसेच विविध स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे .

## शासकीय विश्रामगृह येथे मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन च्या कार्यकारणी बैठक संपन्न झाली



माजलगांव प्रतिनिधी, दि.०३/०८/२०२५ रविवारी रोजी बीड जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृह येथे मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन च्या कार्यकारणी बैठक पदाधिकारी मेळावा शेख रमिज अहेमद जिल्हाध्यक्ष बीड ,यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना बोलून त्यांच्या मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या पद नियुक्ति करून सामाजिक ,शैक्षणिक व विविध क्षेत्रात कार्यक्रमास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या...या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेख सलीम सर, मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन जिल्हा अध्यक्ष परभणी, मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग साहेब यांच्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली माझी माजलगाव शहराध्यक्ष,पदी नियुक्ती करण्यात आली

## शेतकऱ्यांच्या सेवेत महसूल विभाग सदैव तत्पर मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके पारगाव शिरस मंडळ विभागातील महसूल सप्ताह उत्साहात साजरा; शेतकऱ्यांमध्ये समाधान

1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट दरम्यान राज्यभरात महसूल विभागाचा ‘ महसूल सप्ताह ’ उत्साहात साजरा होत आहे . या सप्ताहाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील पारगाव शिरस मंडळ विभागात दिनांक 4 ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले . हे शिबिर मौजे साक्षाळपिंपरी येथे मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले .महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचे आदेश तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम पार पडला . या शिबिरात पारगाव शिरस मंडळातील 13 गावांचा एकत्रित सहभाग होता . यात पारगाव शिरस , तांदळवाडी भिल्ल , शहाबाजपूर , साक्षाळपिंपरी , बहादरपूर , सोनगाव , केतुरा , रुद्रापूर , कुमशी , सौंदाना , खापरपांगरी , उमरद जहागीर व पिंपरगव्हाण या गावांचा समावेश आहे . महसूल विभागाची “आपल्या दारी” संकल्पना : या शिबिराचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , गतिमान व कार्यक्षम बनवणे . “ प्रशासन आपल्या दारी “ ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि योजनांशी संबंधित समस्या थेट गावातच मार्गी लावण्यावर भर देण्यात आला . शिबिराची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली . यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधताना मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांनी ई पीक पाहणी 4.0.0 ॲप संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले . त्यांनी स्पष्ट केले की खरीप हंगामासाठी 1 ऑगस्ट ते 14 सप्टेंबर या कालावधीत शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे स्वतःच बांधावर जाऊन पीक पाहणी नोंद करावी .फार्मर आयडीचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी आवाहन केले की , अजूनही ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घेतले नाही, त्यांनी तो त्वरित काढावा , कारण अनेक कृषी व शासकीय योजनांसाठी याची आवश्यकता भासते .योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वितरण : या शिबिरात संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ सेवा योजना व राज्य निवृत्तीवेतन



योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वितरित करण्यात आले . त्यासोबतच विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले .गौरव व सत्कार : याच कार्यक्रमात बीड उपविभागातून ‘ आदर्श ग्राम महसूल अधिकारी ’ म्हणून साक्षाळपिंपरी येथील ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांना नुकतेच 1 ऑगस्ट रोजी सन्मानित करण्यात आले . त्यानिमित्त महसूल मंडळ आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे आयोजन व उपस्थिती : या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली . यामध्ये ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर , यशवंत सानप , उत्तरेश्वर खांडे , ज्योती आडागळे , स्वाती घुगे यांचे विशेष योगदान होते .या कार्यक्रमास परिसरातील शेतकरी , ग्रामस्थ , महिला , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते . साक्षाळपिंपरीचे ग्रामविकास अधिकारी , सरपंच , उपसरपंच सौरभ नलावडे , अंकुश काशीद , परशुराम काशीद , शंकर काशीद , शहादेव सदाफुले , आदिनाथ क्षीरसागर , सुनिल काशीद , ज्ञानेश्वर काशीद , दत्तात्रय काशीद , सविता पवार , केतुरा चे सरपंच मयूर तळेकर , पारगाव शिरस चे सरपंच दिनकर जमदाडे , रामकिसन वाटमोडे , उमरद जहागीरचे सरपंच दादासाहेब शेळके , तसेच सौंदाना येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू गायके यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली . हा उपक्रम म्हणजे महसूल विभागाची गावकऱ्यांप्रती असलेली कळकळ आणि सेवा-भावना यांचे जिवंत उदाहरण आहे

# बालासाहेब फड यांना नाशिक येथे न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर

नाशिक( प्रतिनिधी) न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार 2025 चे आयोजन रविवार दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी अकरा वाजता संपन्न होणार आहे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, माजी मंत्री श्री धनंजय मुंडे साहेब , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे ,माजी आ. गोविंद केंद्रे, ह भ प डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज, श्री अनिल गर्जे,श्री .कोंडाजी मामा आव्हाड, उद्योजक बुधाची दादा पानसरे, माजी मंत्री खा. भागवतराव कराड, श्री.मोहन दादा घुगे, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह भ प प्रकाश महाराज साठे, ह भ प सोपान महाराज शास्त्री आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे स्थळ क्रांतिवीर श्रावण नाईक शिक्षण प्रसारक संस्था, शरणपुर रोड,कॅनडा कॉर्नर नाशिक येथे कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाच्या संयोजक बाळासाहेब घुगे,स्वागताध्यक्ष: यमुनाताई घुगे अध्यक्ष न्यू विकला बहुउद्देशी सेवाभावी संस्था यांनी केले आहे. या पुरस्काराचे मानकरी पुरस्कारथी आदर्श पुरस्कार

1)बालासाहेब फड : तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,संपादक दैनिक सोमेश्वर साथी परळी वैजनाथ 2)नितीन ढाकणे दैनिक अतुल्य महाराष्ट्र 3) नरहरी उंबरे दैनिक पुण्यनगरी,मनमाड4). विलास माधवराव ढाकणे दैनिक देशदुत, दिंडोरी 5) रामनाथ ढाकणे टिव्ही 9 मराठी जालना 7) अरून खरमटे दैनिक बाळकडू 8) संभाजी मुंडे टीव्ही 9 परळी वैजनाथ १). ह भ प अँड युवा किर्तनकार अस्मिताताई सांगळे सत्येगावकर २) विठ्ठल कांगणे सर आदर्श शिक्षक ३) सागर सानप आदर्श शिक्षक व सागर क्लासेस ४) कांतीलाल सुदामराव बोडके (आदर्श सरपंच - दारणा सांगवी) ५) वसंतराव मुरलीधर



धात्रक (आदर्श शिक्षक) ६. लक्ष्मण एकनाथ गोमासे (बांधकाम व्यावसायिक) ७.गोविद घुगे (आदर्श समाज सेवक) ८. शिवाजी नबाजी ऊगले (ट्रान्सपोर्ट व्यवसायिक) ९. बाळनाथ देवराम घुगे (आदर्श शिक्षक) १०. विठोबा राजे फडे (राजकीय) ११. सचिन कोंडाजी शेळके (प्रशासन) १२ काशिनाथ बाबुराव मुंढे (आदर्श मुख्याध्यापक) १३. जगन आप्पा कुंटे (समाजसेवक) १४. डॉ आनंदा सानप (प्रसिध्द डॉ) १५. ॲड. रमेश काळे, दापुर १६. भास्कर आव्हाड (कुषी अधिकारी- निफाड) १७ दता बबनराव सोनवणे (आदर्श सरपंच गोंदे) 18 अजय विष्णू आघाव राजकीय व सामाजिक क्षेत्रात ) १९गोरख कारभारी घुगे (देशसेवा) २०. संदिप बबन नांगरे (राजकीय) २१ गणपतराव हाडपे (जेष्ठ समाजसेवक) २२आदिती प्रकाश गायकवाड (आदर्श समाजसेविका) २३. डॉ सुनील सांगळे पंचवटी वैद्यकीय सेवा २४ योगेश भास्करराव कातकाडे (समाजसेवक, कर सल्लागार) २५प्रकाश सानप (युवा उद्योजक) २६. मारुती मुंडे (दिव्यांग सेवक - २७)विजय सोनवणे, मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर तसेच सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ २८) तुषार फड युवा उद्योजक व सामाजिक २९) प्रा.राजाराम खाडे सर समाजसेवक ३०), अश्विनी तिडके क्राईम ब्रँच ३१)किरण नागरे पोलिस प्रशासक ३२) अनिकेत मुंडे पोलिस ३३) सुमनताई सोनवणे मा नगरसेविका ३४) नारायण काकड सामाजिक सेवा ३५) रामदास आव्हाड उपायुक्त वित्त व अर्थ मुंबई महानगरपालिका प्रशासकीय ३६) माणिक घुगे भगुर लाहुरी आदी मान्यवर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन न्यू दिव्यांग विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष बाळासाहेब घुगे न्यू विकलांग बहुउद्देशी सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सौ यमुनाताई घुगे संकेत सानप आदी मान्यवरांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com